Mahatma Gandhi Vidyamandir’s

Loknete Vyankatrao Hiray Arts, Science & Commerce College, Panchavati, Nashik -03.

**PG Department of Psychology & Research Centre**


**Seminars/Conferences/Webinars organized by the Department**


**Academic Year 2020-2021**

**National Webinar on Mental health and physical fitness during & after Covid 19 pandemic**

**(26th September, 2020)**

The PG Dept of Psychology, department of Physical Education & the IQAC of M G Vidyamandir’s LVH College organised the National Webinar on Mental health and physical fitness during & after Covid 19 pandemic on 26th September 2020. More than 600 participants from 21 states and some participants from abroad registered for the same. The event was graced by the galaxy of guests, Dr V S More, the joint secretary of M G vidyamandir, Dr Deepak Mane, the Director, Board of Sports, SPPU pune, Shri Ravindra Naik, DSO , Nasik district, the speakers for the National Webinar were Dr Ashwin Bhardwaj, a sports psychologist & Dr Yogesh Bodke, Physical Fitness expert . Principal Dr C.G Dighavkar welcomed all the guests. The event was successfully coordinated by Dr Mrunal Bhardwaj, Dr Santosh Pawar, RoshaniGujrathi& Kishor Rajguru. All the members of IQAC, senior faculties, students, physical directors & sportsmen participated in this National Webinar.








# हिरे महाविद्यालयात वेबिनार

## मानसिक स्वास्थ्य व शारीरिक सुदृढता या विषयावर मंथन

**नाशिक : प्रतिनिधी**



व्यंकटरावहिरेमहाविद्यालयाच्या मानसशास्त्र व क्रीडा विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवरील वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. सदर वेबिनारचा विषय हा "-१९ दरम्यान व नंतर मानसिक स्वास्थ्य व शारीरिक सुदृढता"असा विषय होता. सदर वेबिनारसाठी देशभरातील २१ राज्यांमधून ७३७ प्राध्यापक, क्रीडा मार्गदर्शक, क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा मानसशास्त्रज्ञ, क्रीडा संघटक व खेळाडू यांनी रजिस्ट्रेशन केले होते. सदर वेबिनार हा ऑनलाइन स्वरूपात घेण्यात आला.

सदर वेबिनारचे उद्घाटन दिनांक २६ सप्टेंबर सकाळी ११.०० वा. महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव डॉ. व्ही. एस. मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. दीपक माने (संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग) तसेच नाशिक जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक व महाविद्यालयाचे क्रीडाप्रेमी प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर हे उपस्थित होते. आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. व्ही. एस. मोरे सरांनी या वेबिनार मधील मोठ्या प्रमाणात असलेल्या सहभागाबद्दल व मानसिक स्वास्थ्य व शारीरिक सुदृढता याचे मानवी जीवनातील महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत दिघावकर यांनी महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील चालू असलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरी विषयी व मानसशास्त्र विभागाच्या पी.एचडी. व एम.फील. या केंद्राविषयी माहिती दिली. सदर वेबिनारची गरज व विषयाचे महत्त्व डॉ. मृणाल भारद्वाज ( विभाग प्रमुख, मानसशास्त्र विभाग व समन्वयक ) यांनी विशद केले. या वेबिनारसाठी मानसिक स्वास्थ्य या विषयावर प्रख्यात क्रीडा मानसशास्त्रज्ञ डॉ. अश्विन भारद्वाज यांनी मार्गदर्शन केले तसेच शारीरिक सुदृढता या विषयावर पुणे येथील चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे डॉ. योगेश बोडके यांनी कोविड दरम्यान व नंतर खूप चांगल्या रीतीने व सोप्या पद्धतीने शारीरिक सुदृढता कशी वाढवता येईल याबद्दल मार्गदर्शन केले.

या वेबिनारमध्ये दोन्ही व्याख्यानात व्याख्यात्यांचा परिचय डॉ. संतोष पवार ( विभाग प्रमुख, शारीरिक शिक्षण विभाग) यांनी करून दिला तर सूत्रसंचालन प्रा. रोशनी गुजराथी यांनी केले. सदर वेबिनारच्या यशस्वी संयोजनासाठी डॉ. मृणाल भारद्वाज, डॉ. संतोष पवार, प्रा. किशोर राजगुरू व प्रा. रोशनी गुजराथी यांनी प्रयत्न केले.